मौजे काटेवाडी पाणी पुरवठा योजना, (ता. बारामती, जि. पुणे) या नळ पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः क्र. पापुयो - २०१४ / प्र.क्र. १४०/पापु १७
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई-४०० ०३२
तारीख: २८ मार्च, २०१८

वाचा -

१) शासन पत्र क्रमांक पापुयो-२००९/ प्र.क्र. ८०/ पापु-१७, दिनांक ४/७/२००९.
२) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (पुणे विभाग), पुणे यांचे क्र. मु.अ.(पुणे)/तांशा-४/२२२८, दि. २/९/२००९.
३) मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (नागरी व ग्रामीण), ठाणे यांचे पत्र क्र. मजीप्रा/ मु.अ. (नावग्रा)/तांशा-३/पुणे-सुधा.काटेवाडी/३१५४, दिनांक ३/९/२०१४.
४) मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे प्रादेशिक विभाग, पुणे यांचे सुधारीत तांत्रिक मंजूरीचे पत्र क्र. मु.अ. (पुणे)/तांशा २/१६५५, दि. १३/९/२०१७.
५) शासन निर्णय ग्रापाधो-१११११/प्र.क्र.१३४/पापु-०७,दि.२०/०२/२०१५.
६) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परिक्षणाबाबतचा शासन निर्णय ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७,दि.१५/०६/२०१५ व दि.१४ मार्च, २०१६.

प्रस्तावना

मौजे काटेवाडी,ता.बारामती,जि.पुणे येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु. ६६७.६२ लक्ष (ढोबळ) किमतीच्या अंदाजपत्रकास संदर्भीय क्र.१ येथील पत्रान्वये मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र. २ अन्वये सदर योजनेच्या मूळ अंदाजपत्रकास मुख्य अभियंता, म.जि.प्रा.,पुणे प्रादेशिक विभाग, यांनी तांत्रिक मंजूरी प्रदान केली आहे. तथापी, योजनेची जादा दराची निविदा स्विकारल्यामुळे, दरसूचीतील फरक, व कामाच्या व्याप्तीत झालेल्या बदलामुळे आणि अन्य अपरिहार्य कारणांमुळे योजनेच्या कामात वाढ झाली असल्याने योजनेच्या खर्चात वाढ झाली. त्यानुसार, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (नागरी व ग्रामीण), ठाणे यांनी संदर्भ क्र. ३

अन्वये प्रस्तुत नळ पाणी पुरवठा योजनेच्या आराखडयास व अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. त्यानुषंगाने, संदर्भ क्र. ४ अन्वये मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे प्रादेशिक विभाग, पुणे यांनी सुधारीत योजनेच्या रु. १०४५.३४ लक्ष (ढोबळ) इतक्या किंमतीच्या प्रस्तावास सुधारीत तांत्रिक मान्यता दिली आहे. तद्नुषंगाने प्रस्तुत योजनेच्या आराखडयास व अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (नागरी व ग्रामीण), ठाणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या छाननीअंती मौजे काटेवाडी,ता.बारामती,जि.पुणे या नळ पाणी पुरवठा योजनेची सुधारीत किंमत पुढीलप्रमाणे आहे.

मूळ प्रशासकीय मान्यता	**रु. ६६७.६२ लक्ष**
वाढीव रक्कम	**रु. ३१९.९१ लक्ष**
सुधारीत योजनेची किंमत	**रु. ९८७.५३ लक्ष (वाढीव रकमेवरील ईटीपी चार्जेस वगळल्याने)**

मौजे काटेवाडी पाणी पुरवठा योजना (ता. बारामती, जि. पुणे) या नळ पाणी पुरवठा योजनेच्या **रुपये ९८७.५३ लक्ष (ढोबळ)** **(अक्षरी रुपये नऊ कोटी सत्त्याऐशी लक्ष त्रेपन्न हजार फक्त)** एवढ्या सुधारित किंमतीच्या अंदाजपत्रकास पुढील अटींच्या अधिन राहून सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अटी

१. उपरोक्त नमुद सुधारित किंमतीत उर्वरित सर्व कामे ६ महिन्यात पूर्ण करावीत.
२. या योजनेस सहमती दिलेल्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तसेच सुधारीत तांत्रिक मान्यता देतांना नमुद केलेल्या अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.
३. ही योजना पूर्ण झाल्यावर ती संबंधित ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यात यावी. संबंधित कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, पुणे यांच्याकडून योजना प्रत्यक्षात पूर्ण झाली आहे, या आशयाची सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत योजना ताब्यात घेण्यास संबंधीत ग्रामपंचायत/जिल्हा परिषद जबाबदार राहील. योजना प्रत्यक्षात पूर्ण झाल्यावर लगेच संबंधित कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, कार्यकारी

अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिरकण, कंत्राटदार व संबंधित ग्रामपंचायतचे अधिकारी यांनी योजनेची संयुक्तपणे पाहणी आयोजित करावी आणि अशा पाहणीत कोणतेही दोष आढळून आल्यास योजना ताब्यात देण्यापूर्वी ते सुधारण्यात यावेत.

४. ही योजना राबविणे, त्याचे परिरक्षण, दुरुस्त्या (विशेष दुरुस्त्या धरुन) या साठी दरवर्षी येणारा आवर्ती खर्च भागविण्यासाठी, योजनेतील घसारा किंवा यंत्रसामुग्री नुतनीकरणासाठी संबंधित ग्रामपंचायतीस/जिल्हा परिषदेस शासनाकडून कोणतीही मदत मिळणार नाही.

५. सदर योजना पुर्ण झाल्यावर योजनेची चाचणी घेतल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थेने (संबधित ग्रामपंचायत/ जिल्हा परिषद) योजना हंस्तातरित करुन घेणे बंधनकारक राहील. तसेच योजनेचे लेखे बंद करण्यात यावेत.

६. सन २०१३ मधील CAG च्या अहवालानुसार राज्यातील २१% पाणी पुरवठा योजना या देखाभाल दुरुस्ती अभावी, वीज देयक न भरल्यामुळे (Poor maintenance/nonpayment of electricity of bills) बंद पडल्या असल्याचे दिसून येते. यास्तव सदर योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम राहण्याच्या दृष्टीने पाणीपट्टी दरामध्ये आवश्यकतेनुसार वाढ करण्याची जबाबदारी संबधित ग्रामपंचायत/जिल्हा परिषद यांची राहील.

७. हगणदारीबाबतच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्यात यावी.

८. संदर्भ क्र. ६ येथील शासन निर्णयातील निर्देशानुसार त्रयस्थ तांत्रिक परिक्षणाची कार्यवाही करण्यात यावी.

९. प्रस्तुत योजनेचे काम सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीत पूर्ण करण्यात यावे. तसेच योजना कोणत्याही परिस्थितीत पुनर्सुधारीत केली जाणार नाही याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची राहील.

२. या योजनेच्या सुधारित किंमतीतील वाढीव खर्च **रु. ३१९.९१ लक्ष (अक्षरी रुपये तीन कोटी एकोणीस लक्ष एक्याण्णव हजार फक्त)** हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमा खालील राज्य हिश्श्यातून /जिल्हा नियोजन मंडळाकडून /किमान गरजा कार्यक्रमांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून करण्यात यावा.

३. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १५३/१७/का.१४४३, दिनांक ११/१/२०१८ अन्वये व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ २२/व्यय-३, दि.१५/३/२०१८ अन्वये मिळालेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१६४६३८६६२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dnyaneshwar M Jawale

Digitally signed by Dnyaneshwar M Jawale
DN: CN = Dnyaneshwar M Jawale, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Supply and Sanitation Department
Date: 2018.03.31 11:20:07 +05'30'

(ज्ञा. म्हा. जावळे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
२) मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
३) मा.विधानमंडळ सदस्य (सर्व)
४) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
५) जिल्हाधिकारी, पुणे.
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे
७) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर.
८) महालेखापाल, लेखापरीक्षा, महाराष्ट्र १, मुंबई
९) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था(वासो), बेलापूर, नवी मुंबई.
१०) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे.
११) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे.
१२) संचालक(वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर,नवी मुंबई.
१३) उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
१४) वरिष्ट भुवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.
१०) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, पुणे.
११) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, पुणे
१२) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

१३) प्रधान सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१२) अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१३) मु.अ. तथा वि.का.अ. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१४) कक्ष अधिकारी (कार्या-१४४३), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) कक्ष अधिकारी (व्यय-३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) कार्यासने (पापु-०४, ०६,०७,०९,१०,१३,१८, १९ व २०), पा. पु. व स्व. वि.,मंत्रालय,मुंबई-३२.
१५) निवडनस्ती कार्यासन पापु-१७.